महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सेक्टर ११, सरोवर विहार समोर, बेलापूर सीबीडी, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:एमआयएस-१०२०/सी.आर.०७/२०२२/मा.तं. दिनांक:- १६ मे, २०२४

## -:प्रसिध्दीपत्रक:-

**विषय:**- महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा २०२३
लिपिक-टंकलेखक, गट-क संवर्गाच्या टंकलेखन कौशल्य चाचणीबाबत

**संदर्भ:**- जाहिरात क्रमांक ००१/२०२३ व १११/२०२३

आयोगामार्फत रविवार, दिनांक १७ डिसेंबर, २०२३ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा २०२३ करीता प्रसिध्द जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना टंकलेखन कौशल्य चाचणीसंदर्भात उमेदवारांना विचारण्यात आलेल्या दोन प्रश्नांच्या बाबतीत काही उमेदवारांकडून नमूद उत्तरांमध्ये त्रुट्या असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा उमेदवारांच्या लिपिक-टंकलेखक, गट-क संवर्गाच्या टंकलेखन कौशल्य चाचणीसंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे :-

| अ.क्र. | प्रश्न व नमूद उत्तर | कार्यवाही |
|---|---|---|
| १ | टंकलेखन कौशल्य चाचणीसंदर्भातील दोन प्रश्नांपैकी प्रश्न क्रमांक एक चे उत्तर मराठी अथवा इंग्रजी नमूद केले आहे, तथापि प्रश्न क्रमांक दोन चे उत्तर नमूद केले नाही अथवा प्रश्न क्रमांक दोन चे उत्तर प्रश्न क्रमांक एक च्या उत्तराशी विसंगत आहे. | उमेदवाराच्या प्रश्न क्रमांक एक च्या उत्तरानुसार त्याच्याकडे मराठी अथवा इंग्रजी पैकी ज्या भाषेचे टंकलेखन प्रमाणपत्र आहे त्या भाषेची टंकलेखन कौशल्य चाचणी घेतली जाईल. |
| २ | टंकलेखन कौशल्य चाचणीसंदर्भातील दोन प्रश्नांपैकी प्रश्न क्रमांक एक चे उत्तर मराठी व इंग्रजी अशी दोन्ही भाषेचे टंकलेखन प्रमाणपत्र असल्याचे नमूद केले आहे, तथापि प्रश्न क्रमांक दोन चे उत्तर नमूद केले नाही. | मराठी भाषेची टंकलेखन कौशल्य चाचणी घेण्यात येईल. |
| ३ | टंकलेखन कौशल्य चाचणीसंदर्भातील दोन्ही प्रश्नांची उत्तरे नमूद केली नाहीत अथवा उत्तर शून्य नमूद केले आहे. | उमेदवाराच्या अर्जातील शैक्षणिक अर्हतेमध्ये नमूद माहितीनुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल:-<br>(१) उमेदवाराकडे मराठी व इंग्रजी दोन्ही भाषेची टंकलेखन प्रमाणपत्र असल्यास मराठी भाषेची टंकलेखन कौशल्य चाचणी घेण्यात येईल.<br>(२) उमेदवाराकडे मराठी भाषेचे टंकलेखन प्रमाणपत्र असल्यास मराठी भाषेची टंकलेखन कौशल्य चाचणी घेण्यात येईल.<br>(३) उमेदवाराकडे इंग्रजी भाषेचे टंकलेखन प्रमाणपत्र असल्यास इंग्रजी भाषेची टंकलेखन कौशल्य चाचणी घेण्यात येईल. |

**३.** ज्या उमेदवारांनी अर्ज सादर करताना टंकलेखन कौशल्य चाचणीसंदर्भातील दोन्ही प्रश्नांची योग्य उत्तरे नमूद केली आहेत, अशा उमेदवारांची त्यांनी अर्ज सादर करताना नमूद केलेल्या उत्तरानुसार टंकलेखन कौशल्य चाचणी घेण्यात येईल.

**ठिकाण:**- नवी मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग